Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A+' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/२०२५/ ४७९

दिनांक : १६.०१.२०२५

**प्रति,**
**प्राचार्य/संचालक/परीक्षा केंद्र प्रमुख,**
**सर्व संबंधित महाविद्यालये/परिसंस्था/परीक्षा केंद्र,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर.**

**विषय : बी.ए., बी.कॉम व बी.एस्सी. (व्यावसायिक अभ्यासक्रमा व्यतिरिक्त) प्रथम वर्ष प्रथम सत्र (Pattern-NEP 2024) अंतर्गत व प्रात्यक्षिक परीक्षांच्या गुणांची ऑनलाईन नोंद करणेबाबत..**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, बी.ए., बी.कॉम व बी.एस्सी. (व्यावसायिक अभ्यासक्रमा व्यतिरिक्त) प्रथम वर्ष प्रथम सत्र (Pattern-NEP 2024) व इतर अभ्यासक्रमांच्या नोव्हेंबर/डिसेंबर, २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या अंतर्गत व प्रात्यक्षिक परीक्षा झालेल्या असून प्रस्तुत विद्यापीठामार्फत सदर परीक्षांच्या गुणांची नोंद ऑनलाईन पध्दतीने करण्यासाठी लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु असे निदर्शनास आले आहे की, अद्यापपर्यंत अनेक महाविद्यालय/परिसंस्थानी अंतर्गत व प्रात्यक्षिक परीक्षांच्या गुणांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने केलेली नाही.

**त्यानुसार सर्व संबधित महाविद्यालय/परिसंस्था यांना पुनःश्च सूचित करण्यात येते की, बी.ए., बी.कॉम व बी.एस्सी. (व्यावसायिक अभ्यासक्रमा व्यतिरिक्त) प्रथम वर्ष प्रथम सत्र (Pattern-NEP 2024) व इतर अभ्यासक्रमांच्या अंतर्गत व प्रात्यक्षिक परीक्षांच्या गुणांची नोंदणी सोमवार, २०.०१.२०२५ रोजीपर्यंत करण्यात यावी. सदर तारखेनंतर ऑनलाईन पध्दतीने अंतर्गत व प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण स्विकारले जाणार नाहीत.**

करिता, सर्व संबधित महाविद्यालय/परिसंस्थांनी उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन अंतर्गत व प्रात्यक्षिक परीक्षांच्या गुणांची नोंदणी प्रस्तुत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर करण्यात यावी. जे महाविद्यालय/परिसंस्था उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणार नाहीत. अशा महाविद्यालय/परिसंस्थेच्या विद्यार्थ्यांच्या निकालाबाबत अडचणी निर्माण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य/संचालक यांची राहील व ही बाब गंभीर समजण्यात येवून गुण सादर न करणाऱ्या महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालकांविरुध्द महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ४८(४) नुसार कार्यालयीन कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**यापत्राची प्रत :** कक्ष प्रमुख, सर्व संबंधित कक्ष, राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात येवून सूचित करण्यात येते की, त्यांनी सर्व संबधितांना आपल्या स्तरावरुन अवगत करावे.